# SNDT Arts and Commerce College for Women, Pune

**Activity of Social Initiative by Alumni**

**Nail Free Tree**

12 April 2018

एस.एन.डी.टी कला व वाणिज्य महाविद्यालय तसेच अंघोळीची गोळी यांच्या संयुक्त विद्यमाने माजी विद्यार्थी संघाच्या विद्यार्थ्यांनी ह्यांनी खिळे मुक्त झाड ह्या उपक्रमाचे आयोजन केले होते. ह्यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य, उपप्राचार्य, सर्व प्राध्यापक वर्ग , माजी विद्यार्थी संघ, व विद्यार्थ्यांनी तसेच अंघोळीची गोळी ह्या संस्थेचे सर्व कार्यकर्ते उपस्थित होते.

👇👇👇👇👇👇👇👇

🌲पर्यावरणाचा होणारा ऱ्हास आपण पाहतचं आहोत, तसेच शहरातील झाडांची संख्या ही फक्त ४ % झाली आहे खरंतर ती ३३% च्या वर हवी असते , परंतु शहरातील काही शिक्षीत सुजाण नागरिक ह्या झाडांचा काळ ठरत आहेत. ते आपल्या व्यवसायाच्या जाहीराती सर्रास पणे झाडांना ठोकतात.आपल्या सर्वांना एखादा खिळा टोचला कि आपण केवढ्यांदा ओरडतो , मग झाडांना नसेल का हो इजा होत . लहानपणी झाडे सजीव असतात हे शिकवले जायचे . ते फक्त शिकवलेच गेले नंतर आपण शिकून विसरून गेलो , झाडालाही जीव असतो ह्याचा भान आपल्याच समाजाततील कोणालाही राहिले नाहीय . वर्षानुवर्ष त्या झाडाला त्या जाहिराती ताश्याच्या तश्या असतात , कागद फाटून गेला तरी खिळा मात्र तसाच राहतो ,त्या झाडात तो खिळा अगदी गंजून गंजून जातो ,परंतु याचे दुष्परिणाम कोणाच्या तरी लक्षात येतात का ?खरंतर एका झाडाला ५-६ व त्यापेक्षा अधिक खिळे ठोकले तर त्या झाडाची जीव रस तयार करण्याची क्षमता कमी होते व झाड ऑक्सिजन कमी प्रमाणात सोडते व कालांतराने झाड मरण पावते. एक लक्षात ठेवायला हवे कि झाडे संपली तर माणूस हि संपेल. म्हणूनच हा उपक्रम राबवत आहोत , झाडांना ठोलेले खिळे काढत आहोत , जेणेकरून झाडं मुक्त श्वास घेतील व मनुष्यालाही तो मिळेल देतील.

पर्यावरणाचे महत्त्व लोकांना पटावे , व जनजागृती ह्या उद्देशाने ह्या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.




खिळेमुक्त झाडं
#PainFreeTree

